
## निवडक

### बोरघाटात ट्रक जळून खाक

**खालापूर :** मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरील मुंबई मार्गीकेवर बोरघाटातील ढेकू गावाच्या हद्दीत बारामती येथून गुजरात कडे साखरेच्या गोणी घेऊन जाणारा ट्रकचा लायनर गरम होऊन टायरला आग लागून संपूर्ण ट्रक आगीच्या भक्ष्यस्थानी पडला.



घटनास्थळी खोपोली नगरपालीकेचे अग्निशमन दल, टाटा स्टील अग्निशमन दल व महामार्ग अग्निशमन दल असे ४ बंब दाखल होत आगीवर नियंत्रण मिळवले. साखरेच्या २०० गोणी सह ट्रक ही जळून खाक झाली. ही घटना शुक्रवारी दुपारी २ वा सुमारास घडली.

### घणसोलीतून विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** कामाला जाते असे सांगून घराबाहेर पडलेली एक विवाहिता अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार रबाळे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. शीतल संभाजी यादव वय (वय ३४, रा. घणसोली) उंची पाच फूट, रंग गोरा, केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, बांधा मध्यम असून गळ्यात मंगळसूत्र, अंगात काळा पंजाबी ड्रेस, पायात काळी सॅन्डल घातलेली आहे. सोबत मोबाईल फोन आहे. तिला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या महिलेबाबत माहिती असल्यास त्यांनी रबाळे पोलीस ठाणे (०२२-२७६०६१६२) किंवा पोलीस हवालदार संदीप नवले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### 'लायन्स'तर्फे वॉटर फिल्टरवाटप



**मुरूड :** येथील रायगड जिल्हा परिषदेच्या कोर्लई आणि मांडला शाळेसह अलिबाग तालुक्यातील ताडवागळे, गोंधळपाडा आणि श्रीगाव शाळेत अलिबाग लायन्स क्लबच्या वतीने वॉटर फिल्टरचे वाटप करण्यात आले. लायन्स क्लब ऑफ अलिबाग संस्थेला यावर्षी ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. आरोग्य, शिक्षण, क्रीडा, टॅलेंट हंट, यूथ एक्स्चेंज अशा अनेक क्षेत्रात लायन्सचे मोलाचे योगदान आहे. शाळांची निकड पाहून अलिबाग लायन्सचे अध्यक्ष संजय पाटील, सचिव प्रदीप नाईक, खजिनदार अभिजित आमले यांच्यासह जीएसटी लायन प्रवीण सरनाईक, डिस्ट्रिक्ट ट्रेझरर नयन कवळे, माजी अध्यक्ष अविनाश राऊळ, रणजित जैन यांनी त्वरेने निर्णय घेऊन, सदर उत्तम प्रतिच्या वॉटर फिल्टरचे वाटप केले.

### अवधूत वारगे याचा सत्कार



**अलिबाग :** भारताच्या ७५व्या प्रजासत्ताक दिनी राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते आर.सी.एफ.ज्युनिअर कॉलेज कुरुळ येथील विद्यार्थी अवधूत संदीप वारगे याचा सत्कार करण्यात आला. अवधूत वारगे याने डॉ.एपीजे अब्दुल कलाम सॅटेलाईट लॉन्च व्हेहिकल मिशन २०२३ मध्ये १५० उपग्रह निर्मिती व प्रक्षेपण राज्य तामिळनाडू व ५०वे राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन२०२३ बालेवाडी पुणे येथे सहभाग घेतला होता. या वेळी रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, रायगड अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, माध्यमिक शिक्षणाधिकारी ज्योत्स्ना शिंदे पवार, प्राचार्या संविधा जाधव, प्राची देवळे, रेश्मा संदीप वारगे आदी उपस्थित होते.

# मराठी भाषेच्या संवर्धनासाठी शासन कटीबद्ध

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**नवी मुंबई : बातमीदार**

मराठी भाषा संवर्धनासाठी हे शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. २८) नवी मुंबई येथे केले. नवी मुंबई येथील सिडको प्रदर्शन केंद्र या ठिकाणी आयोजित विश्व मराठी संमेलन-२०२४ च्या दुसऱ्या दिवसाच्या सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

या वेळी मराठी भाषा व शालेय शिक्षण तथा मुंबई (शहर) पालकमंत्री दीपक केसरकर, आमदार गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, मराठी भाषा विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, मराठी आंतरराष्ट्रीय मंचचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर मुळे, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ.शामकांत देवरे आदि मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, मराठी मातीत वैश्विकता आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींनी सांगितलेला धर्म



म्हणजेच महाराष्ट्र धर्म. पसायदानाच्या माध्यमातून सर्वांच्या कल्याणाचा विचार त्यांनी मांडला. हा वैश्विक कल्याणाचा विचार हाच आपला खरा महाराष्ट्र आणि यासोबतच आपली मराठी भाषा आणि संस्कृतीही जोडली गेली आहे. हिंदू हा केवळ धर्मवाचक शब्द नाही तर ती एक जीवन पद्धती आहे. महाराष्ट्राने ही जीवन पद्धती अनादी काळापासून स्वीकारलेली आहे.

महाराष्ट्र म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले, राजश्री शाहू महाराज, अहिल्याबाई होळकर, राजमाता जिजाऊ, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, वारकरी संप्रदाय परंपरा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा, बहिणाबाई चौधरी, वीर सावरकर, या व यांच्यासारख्या अनेक महान व्यक्तींनी विविध क्षेत्रात केलेले काम हाच महाराष्ट्र धर्म होय. हाच धर्म घेऊन जगणारा मराठी माणूस या वैश्विक गुणामुळे जगाच्या पाठीवर सर्वत्र दिसतो. म्हणूनच महाराष्ट्र सर्व जगात दिसतो, असे सांगून फडणवीस यांनी रशिया, जपान मॉरिशस या देशांमध्ये गेल्यानंतर मराठमोळ्या पद्धतीने झालेल्या त्यांच्या स्वागताची आठवण आवर्जून सांगितली.

शेवटी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी मराठी भाषा विभागाचे काम अतिशय तडफेने आणि उत्तमरित्या करीत असल्याबद्दल मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर आणि मराठी भाषा विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर-पाटणकर यांचे दिलखुलासपणे कौतुक केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने आंतरराष्ट्रीय मराठी मंचचे काम करणारे मुख्य समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर मुळे व विविध देशातील उपसमन्वयकांचा गौरव उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदिका समिधा गुरू यांनी केले.

उपमुख्यमंत्री म्हणाले की, ज्ञान आकलन मातृभाषेतून होणे, ही एक महत्त्वाची बाब आहे. मराठी भाषा ही ज्ञानभाषा तर आहेच परंतु तरीही आजच्या काळातील ज्ञानभाषा म्हणून ती परिवर्तित व्हायला हवी. जगात सर्वत्र मराठी लोक दिसतात परंतु आपले अधिराज्य नाही. यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. याविषयी स्वतः प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवीन शैक्षणिक धोरण आखले असून आता या नव्या शैक्षणिक धोरणानुसार कोणतेही शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले जाईल, हा निर्णय घेण्यात आला आहे.

> **आपल्या राज्यातही लवकरच मराठी भाषा भवनाची निर्मिती होणार आहे. यासाठी शासनाने २६० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केलेली आहे. मराठी भाषा भावनाच्या निर्मितीनंतर मराठी भाषा संवर्धनाशी संबंधित असलेली सर्व कार्यालये, मंडळे ही एकाच इमारतीत येणार आहेत. त्यामुळे मराठी भाषा संवर्धनाच्या कामकाजात अधिक सुसूत्रता व गती येईल.**
> **-दीपक केसरकर, मराठी भाषामंत्री**

## महाडच्या दासगाव येथे मोटरसायकल आणि एसटीचा अपघात; तरुणी ठार, एक जखमी

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर रविवारी (दि. २८) सकाळी महाड तालुक्यातील दासगाव गाव हद्दीत निसर्ग हॉटेल समोर मोटरसायकल आणि एसटी बसमध्ये सामोरा समोर धडक होऊन मोटरसायकल वरील एक तरुणी ठार झाली, तर एक जण जखमी झाला आहे.



नितेश शंकर हिलम आणि त्याची बहीण छाया शंकर हिलम दोघे राहणार टोळ हे मोटरसायकल (एमएच ०६ ऐ एक्स ३२१४) वरून महाड ते टोळ असा प्रवास करत असताना तालुक्यातील दासगाव गाव हद्दीत आल्यानंतर त्यांची गोरेगाव ते महाड अशी जाणारी एसटी बस (एमएच०७-सी-७४५४) हिला जोराची धडक बसली. अपघाता नंतर मोटरसायकल वरील दोन्ही जखमींना ग्रामस्थांनी महाड ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेले असता उपचार दरम्यान छाया हिलम हिचा मृत्यु झाला. जखमी नितेश हिलम याला पुढील उपचारा साठी माणगाव येथे सरकारी रुग्णालयात हलवण्यात आले.

अपघात दरम्यान एसटी चालकाने मोटरसायकल वाचवण्याचा प्रयत्नात केला आणि बस रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या डिवायडरवर चढवली. यामुळे बसला मिळालेल्या दणक्याने बसचा दरवाजा जाम झाला आणि बसमधील सर्व प्रवासी काही काळ अडकून पडले. नंतर संकटकाळीन दरवाजाणे सर्व प्रवाशांना बाहेर काढण्यात आले, मात्र अनेक वयोवृद्ध महिलांना बाहेर काढण्यास ग्रामस्थांना कसरत करावी लागली.

अपघातानंतर महामार्गावर वाहतूक कोंडी झाली. महामार्ग वाहतूक पोलीस आणि महाड शहर पोलीस घटनास्थळी दाखल होऊन वाहतूक सुरळीत केली. अपघाताची नोंद महाड शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## नमो चषक गीत गायन स्पर्धेची आज अंतिम फेरी

**पनवेल : प्रतिनिधी**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत देशाने घेतलेली आंतरराष्ट्रीय भरारी व देशाचा झालेल्या विकासाबद्दल आदरभावना व्यक्त करण्यासाठी कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा क्षेत्रात भव्य क्रीडा, कला व सांस्कृतिक मोठ्या उत्साहात पार पडत असून त्या अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या नमो चषक गीत गायन स्पर्धेची अंतिम फेरी सोमवारी (दि. २९) पनवेलमध्ये होणार आहे.

देशाचे कार्यकुशल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाने भारत देशाने जगात मोठी झेप घेतली. त्याबद्दल आदरभावना व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष कार्यकारिणीने दिलेल्या निर्देशानुसार भारतीय युवा मोर्चाच्या संयोजनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात 'नमो चषक' स्पर्धा होत आहेत. त्या अनुषंगाने लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा क्षेत्रात भव्य क्रीडा, कला व सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला. त्यातील एक भाग असलेली गीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली.

वय १६ ते २५ आणि २५ ते पुढे अशा दोन गटात आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेच्या अनुषंगाने पनवेल ग्रामीण व खारघर शहरच्या ऑडिशन खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुल येथे तर पनवेल शहर, कळंबोली शहर आणि कामोठे शहराची ऑडिशन सीकेटी महाविद्यालय खांदा कॉलनी येथे झाली.

यानुसार अंतिम फेरी २९ जानेवारीला पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सायंकाळी ५ वाजता होणार आहे.

## वावे-बेलोशी रस्ता दुरूस्त करा

### सार्वजनिक बांधकाममंत्र्यांना दिले निवेदन

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वावे-बेलोशी रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडे करण्यात आली आहे.

भारतीय जनता पक्ष ओबीसी तालुका अध्यक्ष श्री अशोकजी धर्मा वारगे व अलिबाग तालुका महिला चिटणीस सौ भक्तीजी वारगे यांनी शनिवारी (दि. २७) अलिबाग येथील शासकीय विश्रामगृहामध्ये सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. भाजप रायगड लोकसभा मतदार संघ संयोजक सतीश धारप, भाजप दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, भाजपा दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर, भाजप अलिबाग तालुका अध्यक्ष उदयजी काठे या वेळी उपस्थित होते.



वावे बेलोशी रस्ता खूप दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यावर खूप सारी वर्दळ असते. आदिवासी ठाकूर समाजातील बांधव, भगिनीं रस्त्यावरून प्रवास करत असता, रस्त्यावर खड्यामुळे प्रवास करणारी वयोरुद्ध, गर्भवती महिलांना खूप त्रास होतो असतो. तातडीने हा रस्ता दुरुस्त करून रस्त्यावर मोरी टाकावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## भाजपतर्फे मुरूडमध्ये विविध कार्यक्रम

**मुरूड : प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून भारतीय जनता पक्षातर्फे ज्येष्ठ नेते आण्णा कंधारे यांच्या निवासस्थानी भारत माता पूजनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता.

भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयवंत अंबाजी, जिल्हा कार्यकारणी सदस्य आण्णा कंधारे, मुरूड तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, शहर अध्यक्ष उमेश माळी, तालुका उपाध्यक्ष विनोद भगत, शहर उपाध्यक्ष सुधीर पाटील, माजी तहसीलदार नयन कर्णिक, सी.के.पी.समाज महिला अध्यक्षा नैनिता कर्णिक, अरविंद गायकर, अशील ठाकूर,



अशोक कारभारी, सुनील खेऊर, किशोर म्हसळकर, सीमा कंधारे, प्रतिभा गायकर, श्रद्धा गायकवाड, श्रीराम पतसंस्थेचे अध्यक्ष दिलीप जोशी, दीपाली जोशी, शीतल तटकरे, राजाराम ठाकूर,अशोक कारभारी, उपाध्यक्ष मेघराज जाधव, माजी बंदर निरीक्षक बाळकृष्ण कासार, सरिता खेऊर, सुनील विरकुड, शुभांगी माळी आदी उपस्थित होते.

हिंदू एज्युकेशन संचलित ओंकार विद्यामंदिर येथील सुमारे दोनशे शालेय विद्यार्थ्यांना आण्णा कंधारे यांच्या मार्फत खाऊच्या स्टील डब्बे वाटप करण्यात आले.

पान १ वरुन



## पंतप्रधान नरेंद्र मोदी सक्षम नेतृत्व -मंत्री रवींद्र चव्हाण

या वेळी मार्गदर्शन करताना मंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले की, आताचे आपले सरकार गतिमान आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशाला लाभलेले सक्षम नेतृत्व असून लोककल्याणकारी योजना केंद्र व राज्य सरकार अमलात आणून विकासकामे मोठ्या प्रमाणावर होत आहेत. २०२४मध्ये आपल्याला महाविजय साकारायचा आहे.

खासदार सुनील तटकरे यांनी, स्व. अशोकदादा साबळे यांची आठवण आजही काढली जाते. ते एक धाडसी नेतृत्व होते व त्यांनी आमदार म्हणून चांगले काम केल्याचे सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. महाराष्ट्रात गतिमान असलेले ट्रिपल इंजिनचे सरकार आपल्याला पहायला मिळत आहे, असे सांगून मुंबई-गोवा महामार्गाच्या कामालाही गती दिली जात असल्याचे ते म्हणाले.

आमदार भरत गोगावले यांनी माणगावकरांना विकासकामांसाठी लागेल तेवढा निधी मिळवून देऊ. महाड नगर परिषदेच्या तोडीची देखणी अशी इमारत माणगाव नगरपंचायतीची साकारू, अशी ग्वाही दिली. स्व. अशोकदादा साबळेंचे आशीर्वाद सर्वांच्या पाठीशी आहेत. आज भूमिपूजन झालेल्या विकासकामांच्या उद्घाटनासाठी आपण मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांना आणण्याचा प्रयत्न करू, असेही त्यांनी म्हटले. मशिप्र मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, मुख्याधिकारी संतोष माळी यांनीही मनोगत व्यक्त केले.

## जयंत दबडे यांचा प्रशासनातर्फे सत्कार

### शासकीय गोदामाची केली घाणीच्या विळख्यातून सुटका

**खोपोली : प्रतिनिधी**

खापोली येथे मुळगाव या ठिकाणी अनेक वर्षांपासून अनाधिकृत बांधकामांचे अतिक्रमण आणि घाणीच्या ढिगाऱ्याच्या विळख्यात अडकलेल्या शासकीय धान्य गोदामाची महसूल व पोलीस प्रशासनाकडून सुटका करण्यात आली. या कामी खोपोली येथील शासकीय गोदामाचे व्यवस्थापक जयंत दबडे यांनी पाठपुरावा केला. याबद्दल त्यांचा प्रजासत्ताक दिनानिमित्तच्या कार्यक्रमात खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या हस्ते अभिनंदनपर सत्कार करण्यात आला.

शासकीय धान्य गोदामात नव्याने नियुक्त झालेले व्यवस्थापक जयंत दबडे यांनी वरिष्ठ रायगड जिल्हा पुरवठा शाखेचे अधिकारी, खालापूर तहसीलदार, खालापूर पुरवठा शाखा अधिकारी, खोपोली पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने येथील अनधिकृत बांधकामांचे अतिक्रमण हटवून अनधिकृतपणे वाहन पार्किंग करणाऱ्या वाहन चालक व मालकांवर दंडात्मक कारवाईदेखील केली आहे. या कार्यवाहीबद्दल त्यांचे प्रशासनाकडून अभिनंदन करण्यात आले.



## दुखवटा

### महिपत वाढवळ

**माणगाव :** भाजपच्या पंचायतराज व ग्रामविकास कोकण विभागाच्या संयोजिका शर्मिला शिवाजी सत्वे यांचे पिताश्री कै. महिपत सहदेव वाढवळ (वय ७५) यांचे शुक्रवारी (दि. २६) माणगाव तालुक्यातील कळमजे गावी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, चार मुली, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. महिपत वाढवळ यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि. ४ फेब्रुवारी) तर उत्तरकार्य विधी (बारावे) मंगळवारी (दि. ६ फेब्रुवारी) होणार असल्याचे त्यांचे पुत्र सुरेश वाढवळ यांनी सांगितले.



### सीताराम सकपाळ

**पोलादपूर :** पोलादपूर पंचायत समितीचे सभापती व वारकरी सांप्रदायातील अध्वर्यू सीताराम दौलती सकपाळ (वय ९६) यांचे शुक्रवारी (दि. २६) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, दोन मुले तसेच नातवंडे-पंतवंडे असा मोठा परिवार आहे. राजकारणामध्ये सी.दौ.सकपाळ यांनी पोलादपूर पंचायत समितीचे सभापतीपद प्राप्त केल्यानंतर रायगड शिक्षण प्रसारक मंडळाच्या वरदायिनी माध्यमिक विद्यालय, या शैक्षणिक संस्थेसाठी उर्वरित आयुष्य दिले होते.



## संपादकीय

# बिहारमध्ये राजकीय भूकंप

बिहारमध्ये राजकीय भूकंप झाला आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीतून बाहेर पडून भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए अर्थात राष्ट्रीय लोकशाही आघाडीची पुन्हा एकदा कास धरली आहे. त्यांचा शपथविधीही झाला. ते इंडिया आघाडीतून बाहेर पडणार अशा चर्चा रंगू लागल्या होत्या, पण एवढ्या लवकर हे सारे घडून येईल असे वाटले नव्हते, मात्र लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदींचे बाहू अधिक बळकट करण्यासाठी एकजूट झाली आहे.

**गाजावाजा करून तयार झालेल्या इंडिया आघाडीला एकापाठोपाठ एक धक्के बसत आहेत. सर्वांत आधी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल सर्वेसर्वा असलेल्या आम आदमी पक्षाने लोकसभा निवडणुकीसाठी स्वबळाचे नारे दिले होते. त्यानंतर काही दिवसांपूर्वीच पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री व तृणमूल काँग्रेसच्या आलाकमान ममता बॅनर्जी यांनी 'एकला चलो'चा सूर आळवला. महाराष्ट्रातील जागावाटपावरून झालेल्या बैठकीच्या निमंत्रणावरून झालेला बेबनावही समोर आला. वंचित आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांना आयत्या वेळी बैठकीचे निमंत्रण दिल्यानंतर ते चिडले आणि त्यांनी काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले यांना लक्ष्य करीत सारा संताप व्यक्त केला. हे ताजे असतानाच आता बिहारमध्ये मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी इंडिया आघाडीला मोठा धक्का दिला आहे. बिहारच्या राजकारणात कालपासूनच उलथापालथ सुरू झाली होती. या घडामोडींना अखेर पूर्णविराम मिळाला आहे. नितीश कुमार यांनी राष्ट्रीय जनता दलाशी असलेली आपली युती तोडून मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. गेल्या दोन वर्षांपासून महाआघाडीच्या रूपात संयुक्त जनता दल, राष्ट्रीय जनता दल (राजद), काँग्रेस आणि डावे सत्तेत होते, मात्र नितीश कुमार यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्यामुळे बिहारमधील सरकार आपोआपच बरखास्त झाले. त्यानंतर भाजपने नितीश कुमार यांना पाठिंबा दिला. हा पाठिंबा मिळताच नितीश कुमार यांनी पुन्हा एकदा राज्यपालांकडे सत्तास्थापनेचा दावा केला आणि ते नवव्यांदा मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले आहेत. हा राजकीय भूकंप बिहारमध्ये झाला असला तरी त्याचे हादरे इंडिया आघाडीला पूर्ण देशभर बसले आहेत, कारण भारतीय जनता पक्ष व महायुतीतील इतर सहकारी पक्ष एकदिलाने व ताकदीने लोकसभा निवडणुकीसाठी सज्ज होत आहेत. त्यांचे नियोजनबद्ध मार्गक्रमण सुरू असून गेल्या सुमारे नऊ वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली झालेली देशाची यशस्वी वाटचाल पाहता जनमत त्यांच्याच बाजूने पहावयास मिळते. मोदी सरकारने विविध कल्याणकारी योजना, धाडसी निर्णय, बहुआयामी उपक्रम राबवून देशाचा विकास व प्रगती साधण्यासाठी कुठेही कसर बाकी ठेवलेली नाही. घसरलेली अर्थव्यवस्था त्यांनी पाचव्या क्रमांकावर आणली. महासत्तेच्या दिशेने जाणाऱ्या भारताचा जगभरात डंका दिसून येत आहे. दुसरीकडे इंडिया आघाडीने निकराने लढा देणे अपेक्षित असताना त्यांच्यातच फूट पडू लागली आहे. त्यामुळे जे स्वत:ला सांभाळू शकत नाही ते देश काय सांभाळणार असा संदेश आपसूकच देशात गेला आहे. त्यांची अशीच जर स्थिती राहिली तर येत्या लोकसभा निवडणुकीपर्यंत आणखी काही पक्ष काँग्रेसप्रणित आघाडी सोडून भाजपप्रणित आघाडीत सहभागी झाल्यास आश्चर्य वाटायला नको. काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांची दुसरी भारत जोडो यात्रा सुरू असताना इकडे त्यांच्या आघाडीत झालेली पडझड त्यांच्यासह एकूणच आघाडीच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे.**

# हरिनाम सप्ताहांनी कर्जत तालुका भक्तिरसात डुंबतोय!





**खबरबात**
विजय मांडे

कर्जत तालुक्यात अखंड हरिनाम सप्ताहांना सुरुवात झाली आहे. तालुक्यातील ४५ गावांमध्ये अखंड हरिनाम सप्ताहांचे आयोजन केले जाते. या सप्ताहांमध्ये अनेक धार्मिक कार्यक्रम होतात. कर्जत शहरापासून ते अगदी तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातही अखंड हरिनाम सप्ताहांचे आयोजन केले जाते. या चार-पाच महिन्यांत कर्जत तालुका भक्तिरसात अक्षरशः डुंबत असतो.

कर्जत तालुक्यातील मोठे वेणगावमध्ये अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन वर्षांपूर्वी करण्यात आपले होते. त्यानंतर भाऊ केलटकर, हरिभाऊ वैद्य, विश्वासराव शिंदे, नामदेव दगडे, हभप हरिभाऊमहाराज राणे, हभप मारुतीमहाराज राणे, वसंत दानवे, सुरेश पिंपरे आदींनी कर्जत तालुका परिसर कर्जतच्या श्री कपालेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह सुरू करण्यात आला. त्यानंतर महिला मंडळाच्या छोट्याशा मैदानात नेण्यात आले. त्याचे स्वरूप इतके वाढले की नंतर ज्ञानेश्वर माऊलींचे सप्त शताब्दी वर्षानिमित्ताचे औचित्य साधून १९९१ सालापासून हा सप्ताह पोलीस मैदानात आयोजन करण्यात येऊ लागले. त्या वेळी हे सर्व कार्यकर्ते ज्येष्ठ कीर्तनकार बाबामहाराज सातारकर यांच्याकडे गेले. तेथे त्यांनी तुम्ही माळकरी होणार असाल, तर मी तुमच्या सप्ताहात दोन दिवस कीर्तनासाठी येईन, असे सांगितले. तेव्हा विश्वासराव शिंदे, सुरेश पिंपरे त्यांच्या हस्ते तुळशीच्या माळा गळ्यात घातल्या आणि बाबामहाराज सातारकर कर्जतला आले. त्यांनी दोन दिवस कीर्तनसेवा केली. त्या वेळी कर्जत तालुक्यातीलच नव्हे; तर रायगड, ठाणे, पुणे जिल्ह्यातून त्यांचे कीर्तन ऐकण्यासाठी भाविक आले होते.

पंचेचाळीसाव्या वर्षी बाबमहाराज सातारकर यांच्या कन्या हभप भगवती महाराज सातारकर आणि नातू हभप चिन्मय महाराज सातारकर हे यंदा कीर्तनसेवा देणार आहेत. या सप्ताहाची देणगी रूपाने आर्थिक बाजू सांभाळण्याचे काम चिवडेवाले म्हणून ओळखले जाणारे दत्तात्रेय देशमुख यांच्याकडे होते. सुरुवातीला नामदेव दगडे अध्यक्ष होते. त्यानंतर दामुअण्णा आठवले यांनी १९९० सालापासून अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली. २००४ साली शिवाजीराव देशमुख हे अध्यक्ष झाले. त्यांच्या निधनानंतर हभप नथुराम हरपुडे हे अध्यक्षपद सांभाळत आहेत. ज्ञानेश्वर तिवाटणे यांनी अनेक वर्षे सचिवपद सांभाळले होते. त्यांचे स्मरण करणे क्रमप्राप्त आहे.

संतोष वैद्य, सुरेश पिंपरे, नरेंद्र जोशी, गणेश सोनी, मोहन ओसवाल, साजन ओसवाल, वनिता म्हसे, शिवाजी भासे, शिवलाल गुप्ता, दत्तात्रेय म्हसे, अनिल पाटील, नंदकुमार कदम, संभाजी देशमुख, अमोल देशमुख, मनिषा सुर्वे, अनिल दगडे आदी कर्जतच्या अखंड हरिनाम सप्ताहाची जबाबदारी सांभाळत आहेत. हा सप्ताह नुकताच पार पडला. नेहमीप्रमाणे व्यापारीवर्ग तसेच सर्व सामान्यांकडून देणग्या घेऊन हा उपक्रम करण्याचा निर्णय घेतला गेला. यामध्ये सर्वपक्षीय पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी हातभार लावला.

हभप मारुतीमहाराज राणे यांनी कर्जतसह अनेक तालुक्यात कीर्तनसेवा व अखंड हरिनाम सप्ताह सुरू केले. हजारो जणांना व्यसनमुक्त केले, माळकरी केले. त्यांची कोकण दिंडी प्रसिद्ध आहे. त्यांना रायगड मित्र पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अनेक वारकरी त्यामध्ये सहभागी होतात. हभप बाळासाहेब फणसेमहाराज यांनी कर्जत तालुक्यात अखंड हरिनाम सप्ताह सुरू केले. हभप वामनमहाराज मोधळे, हभप मोरेश्वरमहाराज पेमारे, हभप नथुराममहाराज हरपुडे, हभप मारुतीमहाराज लोभी, हभप भरतमहाराज देशमुख, हभप द्वारकानाथमहाराज देशमुख, हभप प्रवीणमहाराज फराट, हभप हरिश्चंद्रमहाराज जाधव, हभप योगिनीमहाराज थरकुडे आदी कीर्तनकारांनी कर्जतमध्ये कीर्तनरूपी सेवेने समाजप्रबोधनाचे काम केले. हभप श्रीराम महाराज पुरोहित, हभप दिलीपमहाराज राणे हेसुद्धा कीर्तन, प्रवचने करून समाजप्रबोधनाचे कार्य करीत आहेत. या बहुतेक कीर्तनकारांना रायगड भूषण पुरस्काराने सन्मानित केले आहे. या सर्व किर्तनकारांना रंभाजीबुवा थोरवे, मनोहर कडू, सुरेश फराट, अनिल फराट हे अजूनही मृदुंगाची साथ देत असतात. तालुक्यात कर्जत, इंजिवली, वेणगाव, तमनाथ आदी अखंड हरिनाम सप्ताह प्रसिद्ध आहेत. या अखंड हरिनाम सप्ताहामुळे सुमारे सहा महिने कर्जत तालुका भक्तीरसात डुंबलेला असतो.

## बदलते तंत्रज्ञान

# 'रिलायन्स जिओ' करणार वनप्लस कंपनीशी पार्टनरशिप

ONEPLUS

Jio

रिलायन्स जिओ ही देशातील सर्वांत मोठी टेलिकॉम कंपनी आहे. जिओने देशात सर्वांत पहिले ५जी नेटवर्क सुरू केले आहे. आज देशातील अनेक शहरांमध्ये जिओ ग्राहक ५जी सेवेचा लाभ घेत आहेत. त्यामुळेच जिओ हे भारतातील सर्वोत्तम ५जी नेटवर्क आहे, तर वनप्लस एक प्रसिद्ध मोबाईल उत्पादक कंपनी आहे. कंपनी ग्राहकांसाठी टेक्नॉलॉजीचा भरपूर वापर स्मार्टफोन्स बाजारात लाँच करीत असते. या दोन्ही कंपन्या ग्राहकांसाठी काहीतरी खास घेऊन येत आहेत.

चिनी मोबाईल निर्माता कंपनी वनप्लस आणि भारतातील सर्वांत मोठी दूरसंचार कंपनी रिलायन्स जिओ यांनी ५जी तंत्रज्ञान पूर्ण भारतात उपलब्ध करून देण्यासाठी पार्टनरशिप (भागीदारी) केली आहे. या पार्टनरशिपअंतर्गत दोन्ही कंपन्यांच्या नवीन आणि पायाभूत सुविधांचा एकत्रित वापर करून ग्राहकांना एक नवा अनुभव देणार आहे.

जिओ आणि वनप्लसच्या या भागीदारीमुळे वापरकर्त्यांना नवीन वैशिष्ट्ये आणि एक अद्वितीय ५जी नेटवर्कचा एक खास अनुभव घेता येईल. या उपक्रमांना चालना देण्यासाठी दोन्ही कंपन्या अत्याधुनिक ५जी इनोव्हेशन लॅबची स्थापना करणार आहेत. इनोव्हेशन लॅब (प्रयोगशाळा) नवीन तंत्रज्ञानाची चाचणी आणि भविष्यात विकास करण्याचे केंद्र म्हणून काम करील.

वापरकर्त्यांसाठी ५जी अनुभव खास करण्याची हीच वेळ आहे आणि म्हणूनच वनप्लसबरोबर भागीदारी करून जिओने त्या दिशेने एक पाऊल उचलले आहे तसेच पुढील काही महिन्यांत वापरकर्ते उत्कृष्ट गेमिंग, स्ट्रीमिंग व फायजीचा उत्तम वापर अनुभवतील, असे जिओच्या प्रवक्त्याने या पार्टनरशिपबद्दल बोलताना सांगितले आहे, तर जिओसोबतच्या पार्टनरशिपबद्दल बोलताना वनप्लसचे प्रवक्ते म्हणाले की, आमचा जिओवरचा विश्वास या पार्टनरशिपचा एक पुरावा आहे. ही पार्टनरशिप कनेक्टिव्हिटीच्या दिशेने भविष्यात एक धाडसी पाऊल ठरेल.

# गरीबांना मदत करणारे डॉ. अरुणकुमार भगत




**विशेष**

पनवेल महापालिकेचे माजी आरोग्य सभापती तथा रायगड जिल्हा डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अरुणकुमार भगत हे माणसातील देव आहेत, कारण माझ्यासारख्या असंख्य गरजू, गरीब लोकांना सदैव देवासारखे धावून येणारे, रंजल्या गांजलेल्याना मदतीचा हात देणारे व लोकप्रिय तसेच आदरणीय असे हे व्यक्तिमत्व आहे. सकाळी उठल्यापासून ते संध्याकाळी झोपेपर्यंत केवळ समाजातील तळागाळातील सामान्यातील सामान्य माणसांना आपल्या परीने होईल तितक्या मदतीचा हात देणारे अशी त्यांची लोकप्रियता आहे. आज त्यांचा वाढदिवस आहे. त्यानिमित्त त्यांच्याबद्दलचा लेख...

डॉक्टरसाहेब हे माणसातील देव आहेत. त्यांच्याविषयी बोलायला गेलो तर खूप काही बोलण्यासारखे आहे. २००६ साली माणसातील खऱ्या देवाचं दर्शन घडलं! ते या प्रसंगाने... मी एक आदिवासी समाजातील सर्वसामान्य कुटुंबातील एक मुलगा, माझे आई-वडील मोलमजुरी करून कसेबसे दोन वेळचे जेवण मिळवून आपली उपजीविका भागवणाऱ्या कुटुंबातील. मी त्यांच्याकडे एक कंपाउंडर म्हणून काम करण्यासाठी आलो आणि त्या दिवसापासूनच माझ्या जीवनाचा उद्धार झाला. त्यांच्या कुटुंबासोबत मी तीन ते चार वर्ष त्यांच्यासोबत राहिलो असता मला कधीही परकेपणाची वागणूक दिली नाही. त्यांच्या सौभाग्यवती मातृतुल्य अॅड. आशा भगतमॅडम यांनीसुद्धा नेहमी मला मुलासारखी वागवून दिली. त्यामुळे तीन-चार वर्षे कशी निघून गेली हे कळलेसुद्धा नाही. माझ्या आयुष्यात त्यांच्यासारखी प्रेमळ माणसं मी कधीही पाहिली नाहीत.

आदरणीय डॉक्टरसाहेबांनी मला माझे थांबलेले पुढील शिक्षण घेण्यास प्रेरणा दिली व त्यानंतर त्यांच्याच आशीर्वादाने पनवेल तालुक्यातील एका नामवंत संस्थेमध्ये शिक्षक या पदावर कार्यरत आहे. गोरगरिबांविषयी असलेली साहेबांची तळमळ, आत्मीयता पाहून मला म्हणावेसे वाटते...

मोडलेल्या माणसांचे
दुःख सारे झेलताना
त्या अनाथांच्या उशाला दीप लावू
कोणती ना जात तयांची
कोणताना धर्म तयाचा
दुःख विझले... दोन... अश्रू
माणसातल्या माणसांसाठी

सर्वसामान्यांचे दुःख समजून घेणारे व्यक्तिमत्व म्हणजे आदरणीय माझे प्रेरणास्थान, माझा देव म्हणजे डॉ. अरुणकुमार भगतसाहेब.

**-महादू मेंगाळ**

**क्लिक...क्लिक...!**



**कर्जत : रब्बी हंगामासाठी कालव्यांना पाणी सोडले जात असल्याने आंबोट परिसरातील शेतीमध्ये राब तयार होऊ लागले आहेत.**

## आरोग्य प्रहर

# उशिरा झोपताय, मग जेवणाची योग्य वेळ कोणती?

रात्रीच्या जेवणासाठी सर्वोत्तम वेळ कोणती आहे या प्रश्नाचे उत्तर देण्याआधी, आपण करत असलेल्या काही चुका समजून घेणे आणि त्यावर पर्यायी उत्तर शोधणे हे आवश्यक आहे.



पोषणतज्ज्ञ लीमा महाजन यांनी अलीकडेच आपल्या सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका रीलमध्ये रात्रीच्या जेवणाबाबत सामान्यतः होणाऱ्या चुकांविषयी माहिती दिली आहे. अनेकजण रात्री पोटभर जेवूनही काहींना स्नॅकिंगची सवय असते, म्हणजे सतत काही ना काही खात राहायचं, तर काही जण अगदी याउलट रात्री फक्त स्नॅकिंग करतात म्हणजे नीट न जेवता कोरडा खाऊ खाऊन पोट भरतात. या दोन्ही गोष्टी घातक आहेत. शिवाय जेवणानंतर लगेचच अंथरुणावर पडणे ही तर अत्यंत मोठी चूक ठरते. या चुका व त्यावरील उपाय हे जाणून घेण्यासाठी हा लेख सविस्तर वाचा.

पोषणतज्ज्ञ महाजन यांनी सांगितले की, वजन कमी करण्यासाठी रात्रीच्या जेवणात काहीजण कर्बोदके टाळतात, पण जर तुम्हाला कॅलरीजचे सेवन कमी करायचे असेल, तर तुम्ही कधी सेवन करताय इतकंच महत्त्व तुम्ही किती प्रमाणात सेवन करताय याला आहे. तुम्ही रात्री, दुपारी किंवा दिवसभरातील सगळ्या जेवणांमधून थोड्या थोड्या प्रमाणात कार्ब्स वगळूनसुद्धा आहाराचं नियोजन करू शकता, ज्यामुळे सतत वाढत्या कॅलरीज किंवा फॅट्सची चिंता करावी लागणार नाही.

आहारतज्ज्ञ राशी तांतिया (मेट्रो हॉस्पिटल, फरिदाबादच्या मुख्य पोषणतज्ज्ञ) यांनी सांगितले की, रात्रीचे जेवण करण्याची सर्वोत्तम वेळ म्हणजे झोपायच्या दोन ते तीन तास आधी. गॅस होणे, करपट ढेकर, अॅसिडिटी असे त्रास तसेच गॅस्ट्रिक रिफ्लक्स म्हणजे अशी स्थिती जेथे पोटातील अॅसिड अन्ननलिकेत परत जाते, ज्यामुळे अस्वस्थता आणि समस्या निर्माण होतात ते टाळण्यासाठी जेवणाच्या आणि झोपण्याच्या वेळेत दोन ते तीन तासाचा अवधी आवश्य असावा असे.

आपल्या पचनसंस्थेमध्ये अन्नाचा एक मोठा प्रवास होतो, ज्या क्षणापासून ते आपल्या तोंडात अन्न प्रवेश करते तेव्हापासून ते पोटात पोहचेपर्यंत आणि अखेरीस लहान आतड्यात शोषले जाण्यापर्यंत अनेक पायऱ्या हे अन्न ओलांडत असते. संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी अंदाजे दीड ते दोन तास लागतात.

झोपेच्या दोन ते तीन तास आधी जेवण घेतल्याने पचनसंस्थेला काम प्रभावीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक वेळ मिळतो. जेव्हा जेवल्यावर आपण पटकन झोपता तेव्हा शरीराला पचन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही, ज्यामुळे अपचन, अस्वस्थता किंवा झोपेत व्यत्यय येण्याची शक्यता असते.

# रायगडात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**म्हसळा : प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनानिमित्त कन्या शाळेच्या पटांगणात तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी समीर घारे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. नगरपंचायत म्हसळा येथील ध्वजारोहण नगराध्यक्ष संजय कार्णिक यांच्या हस्ते, पंचायत समिती म्हसळा येथील झेंडा वंदन माजी सैनीक आणि विद्यमान वनरक्षक इंगोले यांचे हस्ते, केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे यांच्या हस्ते झाले.

वसंतराव नाईक कॉलेजचे संचालक फजल हळदे यांचे हस्ते, न्यू इंग्लिश स्कूल म्हसळाचे प्राचार्य प्रकाश हाके यांच्या हस्ते, प्राथमिक शाळा नं १चे शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा समिधा वेदक यांच्या हस्ते, डॉ.ए.आर उंडरे इंग्रजी हायस्कूल चे नाझीम चोगले यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले.

तालुक्यातील ३९ ग्रामपंचायत, कार्यालये, हायस्कूल आणि प्राथमिक शाळांतून प्रजासत्ताक दिनाचा ७४ वा वर्धापन दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यांत आला.





**चौक, खापोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील शासकिय कार्यालये, शाळा, महाविद्यालय येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७५ वा वर्धापन दिनानिमित्त तहसील कार्यालयाच्या प्रांगणात तहसीलदार आयुब तांबोळी, खालापूर पंचायत समितीच्या प्रांगणात गटविकास अधिकारी संदीप कराड, ग्रुप ग्रामपंचायत चौक येथे सरपंच रितु ठोंबरे, वावंढळ येथे सरपंच सुहास कदम, ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली येथे सरपंच सौ. पुजा तवले, ग्रुप ग्रामपंचायत वावरले येथे सरपंच सौ.प्रिया विचारे, तुपगाव येथे सरपंच रवी कुंभार,ग्रुप ग्रामपंचायत कलोते येथे सरपंच रेश्मा ठोंबरे, ग्रुप ग्रामपंचायत आसरे येथे सरपंच बळीराम जांभळे, यांच्यासह प्रत्येक गावाच्या प्राथमिक शाळांतून मुख्याध्यापक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय येथे संस्थेचे अध्यक्ष यांनी ध्वजारोहण केले. ग्रुप ग्रामपंचायत चौक येथे सरपंच रितु ठोंबरे यांनी ध्वजारोहण केले.

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स (कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) महाड प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या संचालिका सोनाली धारिया, हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे सेक्रेटरी संतोष बुटाला, गुरुकुल अकॅडमीच्या प्राचार्या वासंती राजप्पन, प्राचार्य सुदेश कदम, उपप्राचार्य राकेश वडवळकर, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी देशभक्तीच्या या उत्साहात सहभागी झाले. हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या संचालिका सोनाली धारिया यांच्या हस्ते अभिमानाने राष्ट्रध्वज फडकवण्यात आला.





**रोहे :** शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात देशाचा प्रजासत्ताक दिन मोठा उत्साहात साजरा करण्यात आले असून तालुक्यात ठिकठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

रोहा अष्टमी नगर परिषद येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण तहसीलदार प्रकाश म्हेत्रे यांनी केले. रोहा तहसील आवारात प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तहसीलदार आवारात शाळेतील विद्यार्थ्यांचे देशभक्तीपर गीत व नृत्य चे आयोजन करण्यात आले होते. पंचायत समितीच्या आवारात गटविकास अधिकारी शुभदा पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. रोहा पोलीस ठाण्याचे ध्वजारोहण सहाय्यक निरीक्षक संदीप येदाळे यांच्या हस्ते करण्यात आले.

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा आगरकोट किल्ला प्रवेशद्वार तटबंदीवर प्रजासत्ताक दिनाचे औचित्याने ध्वजवंदन करण्यात आले. येथे रेवदंडा ग्रा.प. सरपंच प्रफुल्ल मोरे यांचे हस्ते ध्वज फडकविण्यात आला. या वेळी रेवदंडा पोलीस ठाणे इन्चार्ज सहाय्यक पोलीस निरिक्षक राहूल अतिग्रे, उपरिनिक्षक नंदगावे व सहकारी टिमने येथील ध्वजास मानवंदना दिली. कार्यक्रमाचे नियोजन रेवदंडा महसुल विभागाच्या वतीने करण्यात आले.




MAHATRANSCO

## E- Tender NOTICE

**400kV R.S. (O&M) Division Nagothane**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/ Tech/ | Description | Estimated cost | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-27/23-24/70000029635 | Work of carrying out the Earthing Audit (Health Assessment) of existing mat at 400 KV Nagothane Sub Station under 400KV RS O&M Nagothane Division | Rs. 9,32,881.45/- | 04.02.2024 up to 23.59 hrs. |
| 2 | e-Tender-26/23-24/70000029689 | Work of anticorrosive coating & Painting of various ICTs Units and Transformers BY APPLYING ONE COAT OF RED OXIDE (Asian make) AND TWO COATS OF Asian make synthetic Enamel paint of light gray grade 631 at 400 kV Nagothane S/S under 400 KV R.S. (O&M) Division Nagothane | Rs. 22,49,540.37/- | 04.02.2024 up to 23.59 hrs |

**EMD 1% of Estimate cost &** Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ **Contact Person:** Mitesh Goyal (DY.EE) Mob No. 9461456635 Email ID: ee7230@mahatransco.in **Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**



## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १२८/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | अतिरिक्त तळोजा औद्योगिक क्षेत्र ... अतिरिक्त तळोजा औद्योगिक क्षेत्रात चार पदरी पोहोच रस्ता बांधणे, अंतर्गत रस्ते, पाणी पुरवठा मुख्य वाहिनी टाकणे, जलवितरण वाहिन्या टाकणे, सांडपाणी संकलन वाहिन्या टाकणे, कासार्डी नदीवरील पूल बांधणे, सामाईक सुविधा केंद्र बांधणे, विद्युत पायाभूत सुविधा पुरविणे, पथदिवे लावणे, अग्निशमन केंद्र बांधणे, व ट्रक टर्मिनस इत्यादी पायाभूत सुविधा पुरविणे. | ₹ ४८३,४०,४३,३३०.०० |
| २. | पेण-अलिबाग पाणीपुरवठा योजना...जॅकवेलच्या विस्तारासह विद्यमान १२० दशलक्ष प्रतिदिन क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र २४० दशलक्ष प्रतिदिन क्षमतेने वाढविणे, नागोठणे जॅकवेल ते जलशुद्धीकरण केंद्र पोयनाड पर्यंत अतिरिक्त १५०० मि.मी. व्यासाची मृदु पोलदी अशुद्ध उर्ध्व वाहिनी टाकणे. | ₹ ४५९,०४,५४,४००.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०१/०२/२०२४ ते दिनांक ०१/०३/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त कामाबाबत दिनांक ०७/०२/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १४/०२/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १२४/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती.. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सामाईक सुविधा केंद्राच्या इमारतीमध्ये युपीएस प्रणाली व इंटरकॉम सुविधा उपलब्ध करणे. | ₹ १६,०७,५३३.०० |
| २ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्राची देखभाल व दुरूस्ती.. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्रातील कार्यालय व कर्मचारी निवासस्थानातील विद्यमान वायरिंग, नवीन वायरिंग व इतर आवश्यक सामानांसह बदलणे. | ₹ १६,०५,११२.०० |
| ३ | पाताळगंगा येथील नवीन व जुनी पाणीपुरवठा योजना व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.. पाताळगंगा येथील शुद्ध जलउदंचन केंद्र व सांडपाणी उदंचन केंद्राच्या परिचालनाची सेवा पुरविणे. | ₹ ३८,५२,०००.०० |
| ४ | रानसई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... रानसई वॉटर वर्क्सकरीता परिचालनाची सेवा पुरविणे. | ₹ ३०,५९,५४०.०० |
| ५ | रोहा औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. रोहा औद्योगिक क्षेत्रातील अशुद्ध व शुद्ध उर्ध्व जलवाहिन्यावर बसविण्यात आलेल्या पूर्ण बोअर इलेक्ट्रो मॅग्नेटिक फ्लो मीटरची वार्षिक तत्वावर दोन वर्षांच्या कालावधीसाठी देखभाल, दुरूस्ती करणे. (तिसरी मागणी) | ₹ २१,६८,२५२.०० |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक २९/०१/२०२४ ते दिनांक ०५/०२/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त कामाबाबत दिनांक ३०/०१/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ३१/०१/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



## नमुना-१

### खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

**क्र. उजि(भु) राअ/कार्या-१/थेटखरेदी /मौ. वयाळ/एसआर-१५६१/२०२४**
**उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) रायगड (०) अलिबाग यांचे कार्यालय**
**दि. २५/०१/२०२४**

ज्या अर्थी, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन विभाग नवीन पनवेल यांनी खालापुर तालुक्यातील मौजे वयाळ येथील सर्व्हे नं./हिस्सा नं. ३५ क्षेत्र ०.२९.०० हे आर व सर्व्हे नं/हिस्सा नं. ७ ड/१०अ क्षेत्र ०.७७.५० हे.आर. असे एकुण क्षेत्र १.०६.५० हे.आर. या जमिनी वाढीव न्हावा-शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा ३ या सार्वजनिक प्रयोजनाकरीता महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय, क्रं. संकिर्ण ०३/२०१५/प्र.क्र.३४/अ.२, दि.१२ मे, २०१५ व दि. ३०/९/२०१५ व शासन परिपत्रक क्र. एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५/०१/२०१७ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन विभाग नवीन पनवेल यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे सादर केला आहे,

आणि ज्या अर्थी, मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचे आदेश क्रमांक क्र. भूसंपादन/टे-६/मौजे वयाळ/२०२१ दि.२९/०६/२०२१ अन्वये उक्त प्रस्तावासंबधी उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तद्नुषंगिक शासन परिपत्रक, महसूल व वनविभाग क्र.एलक्युएन- ०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२/ दिनांक २५ जानेवारी, २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी आता,

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, मी. श्री. विठ्ठल इनामदार उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) रायगड (०) अलिबाग याद्वारे,

एक) अनुसूची-एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलव्यवस्थापन विभाग, नवीन पनवेल यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे, आणि

दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समिती मार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेडयुल-१ च्या तरतुदीनुसार संबंधित जमीनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

तीन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चीत केलेला मोबदला संपूर्णतः अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

**सही/-**
**(विठ्ठल इनामदार)**
**उपजिल्हाधिकारी (भुसंपादन)**
**रायगड, अलिबाग**

**अनुसूची - १**
**खरेदी द्यावयाच्या जमिनीचा तपशिल**
**गाव - वयाळ, ता. खालापूर, जि. रायगड**

| अ.क्र. | भुमापन क्रमांक /गट क्रमांक सर्व्हे नं/हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर) | जमिनीचा प्रकार | जमिनीचा वर्ग | भुधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | ३५ पैकी | ०.२९.०० | जिरायत | भोगवटादार वर्ग- १ | **कृष्णाबाई दत्तात्रेय पवार**<br>नारायण हरि पाटील<br>ताई हरि पाटील<br>वंदना हरि पाटील<br>नंदा हरि पाटील<br>कुंदा हरि पाटील |
| २ | ७/ड/१०/अ पैकी | ०.७७.५ | जिरायत | भोगवटादार वर्ग-२ | **गणपत विठ्ठल देशमुख**<br>विनायक नानु देशमुख<br>जयराम गोपाळ देशमुख<br>बेबी नथु घारे<br>पार्वती विठ्ठल देशमुख<br>सुभाष विठ्ठल देशमुख<br>वामन विठ्ठल देशमुख<br>सुरेश विठ्ठल देशमुख<br>कांताबाई विठ्ठल देशमुख |

*जमिनीचा प्रकार - १. जिरायत २. बागायत ३. अकृषक
*जमिनीचा वर्ग - १. भोगवटादार वर्ग एक २. भोगवटादार वर्ग दोन ३. सरकारी पट्टेदार ४. इतर (महसुल अभिलेखानुसार वर्ग नमूद करावा)

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक : २९/०१/२०२४**

**सही/-**
**(विठ्ठल इनामदार)**
**उपजिल्हाधिकारी (भुसंपादन)**
**रायगड, अलिबाग**

**क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/२०२/१७०/२०२४**

# वांगणी गावात राष्ट्रवादीला खिंडार

## एकनाथ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेजवळील वांगणी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विद्यमान सदस्य तथा भाजपचे रोहा तालुका सरचिटणीस एकनाथ ठाकूर यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह काही महिन्यांपूर्वी भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षात प्रवेश केला होता. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक तरुण व ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्याचप्रमाणे शनिवारी (दि.२८) पुन्हा एकदा पक्षप्रवेश झाला.



माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या पेण तालुक्यातील वाक्रुल येथील निवासस्थानी वांगणी गावातील राष्ट्रवादीचे ज्येष्ठ कार्यकर्ते हभप रायगडभूषण दळवी गुरुजी, भारतीय कामगार कर्मचारी महासंघ सुप्रीम युनिटचे उपाध्यक्ष कांचन ठाकूर, दीपक दळवी, वांगणीच्या माजी सरपंच लतिका दळवी, स्मिता ठाकूर, संदीप दळवी, नवीन दळवी आदी कार्यकर्त्यांनी एकनाथ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये प्रवेश केला. सर्व प्रवेशकर्त्यांचे धैर्यशील पाटील यांनी स्वागत करून पक्षात मान-सन्मानाची वागणूक देऊन वांगणी गावाच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी ग्वाही दिली.

या कार्यक्रमाला भाजपचे पेण विधानसभा अध्यक्ष प्रसाद भोईर, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष नीलिमा पाटील, दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर, माजी उपाध्यक्ष किशोर म्हात्रे, एकनाथ ठाकूर, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष अपर्णा सुटे, नागोठणे विभागीय माजी अध्यक्ष मोरेश्वर म्हात्रे, वांगणी तंटामुक्ती अध्यक्ष शंकर ठाकूर, अंकुश सुटे, अल्केश ठाकूर, भाऊ तेलंगे, सुरेश तेलंगे, सखाराम ठाकूर, रंजन जांबेकर आदी उपस्थित होते.

# खोपोलीत पाताळगंगा नदीकाठी हळदीकुंकू

## विधवा, घटस्फोटीत, दुर्बल महिलांचा सन्मान



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातून वाहणाऱ्या पाताळगंगा मातृतुल्य नदीची योग्य ती काळजी जनतेने घ्यायला हवी या संदर्भात जागरूकता करण्याचा प्रयत्न सहजसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून नववर्षाचे निमित्त साधून सुरू करण्यात आला. या वेळी दर महिन्याच्या पौर्णिमेला नदीचे ऋण मानण्यासाठी करण्यात येणाऱ्या पुजेसाठी संकल्प करण्यात आला. त्या अनुषंगाने शिळफाटा येथील आरे डेअरीसमोरील घाटावर उपक्रम झाला. दरम्यान, नदीकिनारी महिलांसाठी हळदीकुंकू सोहळ्याचेदेखील आयोजन करण्यात आले होते.



या उपक्रमात शहर व तालुक्यातील विविध महिला संघटना तसेच महिलावर्गाने उत्स्फूर्त सहभाग घेतला. या वेळी खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे चेअरमन संतोष जंगम, हास्य क्लबचे अध्यक्ष बाबूभाई ओसवाल, प्रख्यात बिल्डर दीपेंद्रसिंघ भदोरीया, आमिर राजपूत, ऋतूकमल हॉस्पिटलचे डॉ. श्रीकांत पाटील, उद्योजक मंगेश पडवळकर, ॲड.जयेश तावडे, हनुमान मित्र मंडळ व शिळफाटा ग्रामस्थांनी सहभाग घेतला. त्याचबरोबर मुंबई, खारघर येथून विनोद साडविलकर, रमेश चव्हाण, गोविंद मोरे, डॉ. शिल्पा ठाकूर, डॉ.किरण खैरनार यांनीही भेट देऊन नदी पूजनाचा आनंद घेतला.

या वेळी नदीभोवती दिवे लावून नदीप्रती संकल्प करण्यात आला. नदीपात्रात केलेली रोषणाई लक्षवेधक होती. याआधी झालेली नदी पूजन संकल्पना आवडल्याने आम्ही मुंबईवरून खास पूजेसाठी आलो. नयनरम्य असणाऱ्या पाताळगंगा नदीचे पावित्र्य जपण्यासाठी असणारा हा उपक्रम समाजात मोलाचा संदेश देईल, असा आशावाद मुंबई येथील प्रख्यात रुग्णमित्र विनोद साडविलकर यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहज सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, नदी पूजन उपक्रम प्रमुख हितेश राठोड, हळदीकुंकू उपक्रम प्रमुख बनिता सहा, कार्याध्यक्ष माधुरी गुजराथी, उपाध्यक्ष इशिका शेलार, सचिव अखिलेश पाटील, खजिनदार संतोष गायकर, महिला संघटक निलम पाटील, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुलकर्णी, खालापूर तालुका प्रमुख मोहन केदार, मार्गदर्शक राजेंद्र फक्के, सल्लागार नरेंद्र हर्डीकर, गणेश राक्षे, नम्रता परदेशी, बंटी कांबळे, दमन सिंघ, चंद्रप्रकाश उपाध्याय, दीपक कांबळे, योगिता जांभळे, मनीषा नरांगळे, दिव्या मशरू यांनी परिश्रम घेतले; तर उपक्रमासाठी दिवेश राठोड, उबेद पटेल, ऋतिक मयेकर, योगेश शिंदे, सुरेखा खेडकर, वैशाली कोळी, सुनील घावटे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# मंगेश दांडेकरांच्या प्रवेशाने मुरुडमध्ये शिवसेना मजबूत

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडचे माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष मंगेश दांडेकर यांनी आपल्या समर्थकांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. आमदार महेंद्र दळवी आणि जिल्हा परिषदेच्या माजी पक्ष प्रतोद मानसी दळवी यांनी त्यांचे स्वागत केले.



मंगेश दांडेकर हे मुरूडचे दहा वर्ष नगराध्यक्ष; तर आठ वर्षे राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष होते. तालुकाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर ते काही महिने मौन बाळगून होते, परंतु आता त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यांच्या प्रवेशामुळे मुरूड शहरात शिवसेनेचे पारडे जड झाले आहे.

या कार्यक्रमास शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, मुरूड शिवसेना शहर प्रमुख संदीप पाटील, माजी नगराध्यक्ष अशोक धुमाळ, तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, माजी सभापती विजय पाटील, माजी नगरसेवक संदेश भगत, महेश भगत, महेश पाटील, गिरीश साळी आदी उपस्थित होते.

या वेळी मुरूड पालिकेचे माजी शिक्षण सभापती नितीन पवार, राष्ट्रवादीचे माजी शहराध्यक्ष विजय भोय, संजय पोतदार, दीपक शिरवणकर, निखिल पाडगे, मुकेश दांडेकर, राजेश दांडेकर, साहिल दांडेकर, सोहम दांडेकर, दयानंद दांडेकर, संतोष रणदिवे, मंगेश कौलकर, विलास पाटील यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

आपल्या पक्षप्रवेशाबाबत प्रतिक्रिया देताना मंगेश दांडेकर यांनी सांगितले की, माझ्यासोबत बरेचशे कार्यकर्ते पक्षप्रवेश करणार आहेत. लवकरच पक्षप्रवेशाचा एक मोठा कार्यक्रम होणार आहे.

# बौद्ध महासभेकडून पुरस्कारांचे वितरण

**पेण : प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनानिमित्त भारतीय बौद्ध महासभा रायगड जिल्हा पेण शाखेच्या वतीने रायगड समाजभूषण पुरस्कार सोहळ्याचे आयोजन महात्मा गांधी वाचनालय येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रदेशाध्यक्ष भिकाजी कांबळे, कोषाध्यक्ष विजय कांबळे, सरचिटणीस सुशिल वाघमारे, रायगड जिल्हाध्यक्ष विजय गायकवाड, महिला जिल्हा सदस्य संपदा चव्हाण, मनिषा सुर्वे, निवृत्त पोलीस अधिकारी पी.झेड. गाडे, तालुकाध्यक्ष चंद्रकांत सोनवणे, सरचिटणीस सचिन कांबळे आदींसह पदाधिकारी, महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# शासकीय कर्मचाऱ्यांनी मतदार दिनानिमित्त घेतली सामूहिक शपथ

**महाड : प्रतिनिधी**

२५ जानेवारी हा दिवस देशात राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी निवडणूक आयोगाची स्थापना झाली आणि त्यानंतर खऱ्या अर्थाने २६ जानेवारीपासून संविधानिक भारत अशी भारताची ओळख निर्माण झाली. २०११पासून हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात झाली.



आम्ही भारताचे नागरिक लोकशाहीवरील निष्ठा ठेवून याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू, मुक्त, नि:पक्षपाती, शांतता पूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू आणि प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता, कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदान करू, अशी शपथ महाड येथे सर्व शासकीय विभागात सामूहिकरीत्या घेण्यात आली.

या दिनानिमित्त झालेल्या जिल्हास्तरीय कार्यक्रमात महाड तहसील कार्यालय येथील निवडणूक लिपिक स्वाती शेठ यांना निवडणूक प्रक्रियेतील उत्कृष्ट कामाबद्दल जिल्हाधिकारी यांच्यामार्फत प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

शासकीय कार्यालयासह मतदान केंद्रावरदेखील अशाच पद्धतीने हा दिवस साजरा करण्यात आला असल्याचे महाडचे तहसीलदार महेश शितोळे यांनी या वेळी सांगितले.

# आमदार प्रताप सरनाईक यांच्याकडून कर्जतमधील प्रती आळंदी प्रकल्पाचे कौतुक

**कर्जत : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र थोरवे यांच्या संकल्पनेतून कर्जत शहरात ५२ फूट उंचीची श्री विठ्ठलाची मूर्ती उभी राहिली आहे. वांगणी येथे खासगी कामासाठी आलेले आमदार प्रताप सरनाईक हे कर्जत येथे आले आणि त्यांनी विठ्ठलाची मूर्ती पाहून प्रती आळंदी प्रकल्पाचे कौतुक केले.

एक जाणकार कलावंत म्हणून ठाणे माजिवडा मतदारसंघाचे आमदार प्रताप सरनाईक ओळखले जातात. वांगणी येथे खासगी कामासाठी आलेले आमदार सरनाईक सायंकाळी कर्जत येथे आले. जिल्हाप्रमुख संतोष भोईर यांनी त्यांचे विठ्ठलमूर्ती देऊन स्वागत केले.



या वेळी शिवसेने मतदारसंघ संघटक शिवराम बदे, संपर्कप्रमुख पंकज पाटील, कर्जत संघटक सुनील रसाळ, मतदारसंघ निवडणूक प्रमुख प्रसाद थोरवे, संकेत भासे, युवा सेना जिल्हा चिटणीस संदीप भोईर, माजी सभापती राहुल विशे, शहरप्रमुख अभिषेक सुर्वे, वैभव सुरावकर, उत्तम शेळके, सचिन भोईर, दीपक भोईर आदी उपस्थित होते.

# आक्षेपार्ह पोस्ट टाकू नका, अन्यथा कारवाईला सामोरे जा!

## श्रीवर्धन पोलिसांकडून नागरिकांना आवाहन

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन पोलिसांनी आपल्या हद्दीतील सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणीही कोणत्याही धर्म, जात, पंथ याबाबत आक्षेपार्ह पोस्ट, फोटो, स्टिकर, मजकूर, स्टेटस ठेवू नये तसेच सोशल मीडियावर कोणत्याही प्रकारच्या आक्षेपार्ह पोस्ट शेअर करू नयेत.

अयोध्या येथे २२ जानेवारी रोजी राम मंदिरामध्ये प्रभू श्रीरामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या वेळी संपूर्ण देशामध्ये जोरदार जल्लोष साजरा करण्यात आला, परंतु त्यानंतर सोशल मीडियावर टाकण्यात येणाऱ्या पोस्ट व ठेवण्यात येणारे स्टेटस यामुळे काही ठिकाणी दोन गटांमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली. ते ध्यानात घेता अशा प्रकारे पोस्ट व्हायरल करून कोणीही वातावरण खराब करू नये यासाठी श्रीवर्धन पोलिसांनी खबरदारी घेतली आहे.

श्रीवर्धन पोलीस ठाणे तसेच रायगड जिल्हा सायबर सेल अशा प्रकारच्या सर्व पोस्टवर लक्ष ठेवून आहेत. वादग्रस्त पोस्ट व्हायरल करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे स्पष्ट करून कोणत्याही प्रकारच्या अफवा किंवा चुकीच्या गोष्टी निदर्शनास आल्यास तात्काळ श्रीवर्धन पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन निरीक्षक यु. बी. रिकामे यांनी नागरिकांना केले आहे.

# राजपुरी येथे आंतरशालेय स्पर्धा रंगली

**मुरूड : प्रतिनिधी**

अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लि.च्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळा राजपुरी येथे आंतरशालेय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. याचे उद्घाटन सरपंच सुप्रिया गिदी यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी कोळी समाजाचे प्रमुख विठ्ठल पाटील होते.




या स्पर्धांमध्ये राजपुरी ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील सर्व चार शाळांनी सहभाग घेतला. सर्व शाळांचे मिळून २५० विद्यार्थ्यांचा समावेश होता. विविध नृत्य, कोळी समाज संस्कृतीला अनुसरून लग्नाची प्रथा यावर उल्लेखनीय नाटक विद्यार्थ्यांनी सादर केले.


या वेळी उपसरपंच इस्माईल सिद्दिकी, ग्रामपंचायत सदस्य, आगरदांडा केंद्रप्रमुख जितेंद्र मकू, राजपुरी जिल्हा परिषद शाळा मुख्याध्यापिका सुचेनी पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नरेन घागरी, दिघी पोर्ट सुरक्षा विभागाचे प्रमुख चंद्रदेव सम्ब्याल, अदानी फाउंडेशनच्या जयश्री काळे, सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी, सर्व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, कोळी समाजाचे सदस्य, तसेच पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.

अदानी फाउंडेशनच्या काळे यांनी अदानी फाउंडेशनमार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन माजी शिक्षक प्रल्हाद गोंजी यांनी केले, तर आभार मकू यांनी मानले. सर्व विद्यार्थ्यांना भोजन व्यवस्था निकेश हांडे यांनी केली. अदानी फाउंडेशनचे अवधूत पाटील व शाळा व्यवस्थापन समिती यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांनी साकारला वाहतूक प्रकल्प

**अलिबाग : प्रतिनिधी**

चेंढरे येथील चिंतामणराव केळकर विद्यालय पूर्व प्राथमिक विभागातर्फे वाहतूक व्यवस्था हा प्रकल्प राबवण्यात आला. या प्रकल्पामध्ये अश्मकालीन युगात झालेल्या चाकाच्या शोधामुळे वाहतूक यंत्रणांमध्ये कशा प्रकारे बदल होत गेले याचे सादरीकरण करण्यात आले. यासाठी गावातील वाहतुकीच्या साधनांपासून ते शहरातील वाहतुकीच्या साधनांपर्यंतची प्रगती दाखवण्यात आली तसेच गावाचा सुंदर देखावा उभारण्यात आला होता.



मातीच्या रस्त्यापासून ते थेट डांबरी रस्त्यापर्यंत कन्स्ट्रक्शन करण्यासाठी लागणाऱ्या वाहतुकीच्या गाड्या यांचेही यामध्ये प्रदर्शन भरवण्यात आले होते. शहरी भागात मोठ मोठ्या प्रशस्त इमारतींपासून ते शाळा-कॉलेज, हॉस्पिटल, टपालघर, पोलीस ठणे यासारख्या इमारतींचाही यात समावेश करण्यात आला होता जुन्या-नवीन सर्व प्रकारच्या लहानात लहानपासून ते मोठ्यात मोठ्या गाडीपर्यंतचा समावेश होता. गाव, शहर, रस्ते, वाहतूक, रेल्वे वाहतूक, जलवाहतूक, हवाई वाहतूक अशा वाहतुकीच्या माध्यमांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते.

या प्रकल्पाचे उद्घाटन चिंतामणराव केळकर विद्यालयाचे अध्यक्ष अमर वार्डे यांच्या हस्ते झाले. पूर्व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांना तसेच प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनासुद्धा या प्रदर्शनाचा लाभ घेता आला. या संकल्पनेमुळे विविध प्रकारच्या वाहतूक व्यवस्थेचे कामकाज कशा प्रकारे चालते याचे ज्ञान मुलांना मिळाले.

# सायकलपटू स्नेहल माळीला खेलो इंडिया स्पर्धेत कांस्यपदक

**पनवेल : वार्ताहर**

चेन्नई येथे झालेल्या खेलो इंडिया राष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेत खारघरच्या स्नेहल शत्रुघ्न माळी हिने कांस्यपदक व तीन लाख रुपयांचे बक्षीस पटकाविले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते.

स्नेहल माळीचे वडील रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. पुण्याच्या फिनिक्स सायकलिंग क्लबचे प्रशिक्षक दर्शन बारगुजे यांचे स्नेहलला ट्रेनिंग व मार्गदर्शन लाभते.



माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, बेलापूरच्या आमदार मंदाताई म्हात्रे, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह इतर मान्यवर व हितचिंतकांनी स्नेहलचे कौतुक केले. त्याचप्रमाणे महाराष्ट्र सायकलिंग असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड विक्रम रोठे, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष आणि संघटन सचिव प्रताप जाधव, सचिव प्रा. संजय साठे, खजिनदार भिकन आंबे यांनी अभिनंदन केले.




## राष्ट्रीय तायक्कांदो सब-ज्युनिअर स्पर्धेसाठी सुभाष पाटील, गार्गी पाटील यांची निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई)मार्फत पुणे बालेवाडी येथे झालेल्या राज्यस्तरीय सब-ज्युनिअर तायक्कांदो स्पर्धेत रायगडची खेळाडू गार्गी पाटील हिने सुवर्णपदक जिंकले. ती आता छत्तीसगडमधील बुद्धापारा येथे होणाऱ्या ३७व्या राष्ट्रीय सब-ज्युनियर क्युरेगी स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधीत्व करणार आहे, तर तायक्कांदो आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक सुभाष पाटील यांची राष्ट्रीय क्युरेगी व पुमसे राष्ट्रीय सब-ज्युनिअर स्पर्धा प्रमुखपदी नेमणूक केली आहे.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गार्गी पाटील व सुभाष पाटील यांना शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे रायगड तायक्कांदो असोसिएशन, तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई)चे पदाधिकारी, प्रशिक्षक व खेळाडू तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडूनही अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.







## गटविकास अधिकाऱ्यांनी प्रजासत्ताक चषक जिंकला

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर युवा वकील संघटना व युवा वकील क्रिकेट संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय कार्यालयांचे क्रिकेट सामने आयोजित करण्यात आले होते. यात गटविकास अधिकारी अ संघाने प्रजासत्ताक चषक पटकाविला.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून खालापूर न्यायालय संघ, युवा वकील अ, वकील ब, पंचायत समिती अ व ब, तहसील संघ, डॉक्टर संघ आणि स्थानिक गावदेवी संघ यांच्यात चुरशीच्या लढतीत गटविकास अधिकारी अ व ब या दोन्ही संघांनी अंतिम फेरीत प्रवेश केला होता. अखेर अ संघाने बाजी मारून प्रजासत्ताक चषक जिंकला. विकी आम्रे सामनावीर ठरला. वैशिष्ट्य म्हणजे खालापूर दिवाणी न्यायाधीश आर.ए. वाकळे, दिवाणी न्यायाधीश पी.एम.माने, तहसीलदार आयुब तांबोळी, गटविकास अधिकारी संदीप कराड, नायब तहसीलदार सुधाकर राठोड मैदानात उतरले आणि फलंदाजी, गोलंदाजीबरोबर क्षेत्ररक्षण केले. तलाठी, ग्रामसेवक, शासकीय कर्मचारी यांनीही खेळाचा आनंद लुटला.

विधीतज्ज्ञ सचिन पाटील, अजिद गायकवाड, संदेश धावारे, राजेंद्र येरूणकर, अभिजित बलकवडे, नितीन तोरणे यांनी उपस्थित राहून संघांना प्रोत्साहन दिले. क्रिकेट सामने यशस्वीतेसाठी विधीतज्ज्ञ सोमनाथ दळवी, उमेश पवार, योगेश मानकवले, जितेंद्र जाधव, जयेश तावडे, मनोज पाटील, तुषार बोम्बे, भगवान लाले, मिलिंद गायकवाड, रितेश पाटील, महेश भद्रिके, मिलिंद सुरावकर, मयूर कांबळे, गजानन पवार, राजू मोरे, अभिजित बलकवडे, संजय टेंबे, रमेश पाटील, गणेश दळवी, करण कडव यांनी विशेष परिश्रम घेतले.







## उरणच्या जलतरणपटूंचे स्पर्धेमध्ये यश

**उरण : वार्ताहर**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पेणमधील मामा वासकर जलतरण तलाव येथे अखिल भारतीय मराठा महासंघांच्या वतीने जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सचिन शिंगरूत आणि किशोर पाटील यांच्या संकल्पनेतून झालेल्या या स्पर्धेत जिल्हाभरातून स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्पर्धेत उरणच्या स्पर्धकांनी छाप सोडल्याचे पहायला मिळाले.

फ्रिस्टाईल, बॅकस्ट्रोक, बटरफ्लाय आणि ब्रेस्टस्ट्रोक या चारही प्रकारातील ५० मिटर अंतराच्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. यामध्ये सहा वर्षे वयोगटापासून खुला गट आणि ज्येष्ठ नागरिक गटांच्याही स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेत उरणच्या स्पर्धकांनी सुवर्ण, रौप्य, कांस्य अशा सर्वाधिक ३३ पदकांची कमाई करीत सुयश प्राप्त केले. यामध्ये मोहित म्हात्रे याने तीन सुवर्ण व एक कांस्य, रुद्राक्षी टेमकर व शगुन यांनी तीन सुवर्ण व रौप्य, आर्यन मोडखरकरने तीन सुवर्ण व एक कांस्य, वृतिका म्हात्रेने एक सुवर्ण, दोन रौप्य आणि एक कांस्य, अद्वैत हरगुडेने प्रत्येकी एक सुवर्ण, रौप्य व कांस्य, जयदीप सिंगने एक सुवर्ण व दोन रौप्य, आणि वेदांतने दोन रौप्यपदके जिंकली. या सर्वांचे अभिनंदन होत आहे.




| | | |
|---|---|---|
| सोमवार २९ जानेवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | राधा कृष्ण भजन मंडळ कुंडेवहाळ, बुवा -संदिप कडू (वेश्वी), पखवाज -ज्ञानेश्वरी खैरे. |
| मंगळवार ३० जानेवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | श्रीपती बाबा भजन मंडळ, ज्ञानेश्वर बुवा गव्हाण, पखवाज- गौरव म्हात्रे व मंडळी. |
| बुधवार ३१ जानेवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | भैरवनाथ प्रासादिक भजन, बुवा -सुरेश भोईर (कर्जत), पखवाज -ज्ञानेश्वर खैर. |
| गुरूवार ०१ फेब्रुवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | श्री विष्णूलक्ष्मी प्रासादिक महिला भजन मंडळ (दापोली), कुमारी स्नेहल पाटील, पखवाज -सुनिल पाटील, चालक -बळीराम |
| शुक्रवार ०२ फेब्रुवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | दत्तप्रसाद भजन मंडळ (गव्हाण), बुवा -देवानंद कोळी व मंडळी |
| शनिवार ०३ फेब्रुवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | हनूमान प्रासादिक भजन मंडळ (पडघे), बुवा -संगीतरत्न शंकूबुवा पडघेकर , पखवाज -किशोर पाटील, चालक -पांडूशेठ |
| रविवार ०४ फेब्रुवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | दत्ताप्रसाद भजन मंडळ (कोपर), बुवा -नितीन ठाकूर व रशिक कानडा, पखवाज -गौरव म्हात्रे आणि तुकाराम कोळी. |
| सोमवार ०५ फेब्रुवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | कृष्णा बुवा पवार गावदेवी प्रासादिक वांवजे भजन मंडळ, पखवाज -विशाल पाटील |
| मंगळवार ०६ फेब्रुवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | पंडित निवृत्ती बुवा चौधरी नादब्रम्ह साधन मंडळ रांजणपाडा, पखवाज - निलेश पाटील |






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com